[illegible]

[illegible]

[illegible]

दि.: ३०/११/२०२२ वेळ: ११:०० वा

3

२/११/२२

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २२/११/२०१२.

## मा. विशेष महासभा

**मा. विशेष महासभा सूचना क्रं. :- ०४, दिनांक २२/११/२०१२.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, शासन आदेश क्र. संकिर्ण/२०१२/अनौ.१८३/प्र.क्र.३२१/१२/नवि-२६, मंत्रालय, मुंबई. दि. २०/११/२०१२ च्या आदेशानुसार **"बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९"** या कायद्यातील महत्वांच्या तरतुदींची माहिती सन्मा. सदस्य व पदाधिकारी यांना होण्यासाठी मा. विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्याबाबत आदेश दिलेला आहे.

त्या अनुषंगाने शुक्रवार दि. ३०/११/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात मा विशेष महासभा आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ

नगर भवन, मांडली तलाव, तीसरा मजला, भाईंदर (प.)
ता.जि. ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी क्रमांक : २८१९ ०२२३, फॅक्स नं. २८१९ ७६३६


दिनांक :- २३/११/१

## // गोषवारा //

विषय :- "बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९" ची जनजागृती करणेसाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नगरसेवकांची विशेष सर्व साधारण सभा आयोजित करणे बाबत.

संदर्भ :- १. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांचे अ.शा. पत्र क्रमांक. आर.टी.ई.-२०१२/(११४/१२)प्राशि-१, दि. २५/१०/२०१२.
२. मा. राज्य प्रकल्प संचालक, मुंबई यांचे जा.क्र मप्राशिप/सशिअ/RTE/२०१२-१३/४१५२ दि. २० नोव्हेंबर २०१२ चे पत्र.

महोदय,

वरील संदर्भिय विषयान्वये **"बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९" (RTE Act 2009)** आपणांस ची अंमलबजावणी दि. १ एप्रिल २०१० पासुन करण्यात येत असल्याने शिक्षण हक्क कायदयातील तरतुदींची अंमलबजावणी करणेसाठी राज्य शासनाने दि. ११-१०-२०११ व दि. २५-५-२०१२ रोजी नियमावली अधिसूचित केली आहे. तसेच या संदर्भातील शासन निर्णयही वेळोवेळी निर्गमित केले आहेत. शिक्षण हक्क कायदयाची सर्व स्तरावर जनजागृती होणेसाठी भारत सरकारने शिक्षणाचा हक्क अभियान सुरु केला असुन त्याचा राज्यात मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि. ११ सप्टेंबर २०१२ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे शुभारंभ करण्यात आला आहे. शिक्षण हक्क कायदयातील तरतुदीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासना सोबत स्थानिक प्रधिकरणाची आहे. त्या अनुषंगाने स्थानिक प्रधिकरणातील पदाधिकाऱ्यांना शिक्षण हक्क कायदया विषयी जागृती करण्यासाठी उद्बोधन करणे गरजेचे आहे. त्या बाबत सर्व जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपरिषदांच्या विशेष सर्व साधारण सभेमध्ये शिक्षण हक्क कायदयावर आधारीत जनजागृती करावयाची आहे. **"बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९"** च्या कायदयातील तरतुदींची अंमलबजावणीची रुपरेषा, जिल्हयाचा व प्रत्येक तालुक्याचा DISE data, शिक्षण हक्क अभियान सदर विशेष सर्व साधारण सभेते मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हास्तरावरुन अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. दि. ३०-११-२०१२ रोजी महानगरपालिका स्तरावर घेण्यात येणाऱ्या विशेष सर्व साधारण सभेस मार्गदशन करण्यासाठी पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. २६-११-२०१२ रोजी सकाळी १०:०० वाजता

बालेवाडी, पुणे येथे एक दिवशीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकित नेमलेले अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ठाणे जिल्हया करीता श्री. महावीर माने - आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्ष परिष्द, पुणे, श्री. अशोक मिसाळ - शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद ठाणे, श्री. सु.बा माळी - शिक्षण उपनिरीक्षक, बृहन्मुंबई, उत्तर यांची तज्ञ मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली असुन दि. ३०-११-२०१२ रोजीच्या विशेष सर्व साधारण सभेमध्ये सन्मानीय नगरसेवक यांना मार्गदर्शन करणे करीता उपस्थित राहणार आहेत. तरी सन्मानीय नगरसेवक यांना माहितीकरीता माहितीपुस्तीका या कार्यालयात उपलब्ध असुन सन्मानीय नगरसेवक यांना देण्याकरीता सदरची माहितीपुस्तीका आपणास देण्यात येत आहे.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
मिरा भाईंदर महानगरपालिका

ओपवारा प्राप्त
दि. २३/११/१२
वेळ = ०४.४० सायं.

मा. महासभा ओपवाद
रजिस्टर नोंद क्र. ३ ९३

NOV-21-2012 15:07 From:

आयुक्त दालन
आवक क्र.: १६३ मंत्रा
दिनांक: 21/11/12

"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९" या कायद्यातील महत्त्वाच्या तरतूदींची माहिती होण्यासाठी महानगरपालिकांमध्ये "विशेष सर्वसाधारण सभा" आयोजित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन आदेश क्र. संकीर्ण २०१२/ अनौ. १८३/ प्र.क्र. ३२१/१२/ नवि-२६
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दि. २० नोव्हेंबर, २०१२.

मिरा - भाईंदर महानगरपालिका
शिक्षण मंडळ
आवक क्र. 9692
दिनांक 21/11/2012

**आदेश**

केंद्र शासनाने "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९" पारित केला असून त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून संपूर्ण देशात करण्यांत येत आहे. या अधिनियमान्वये ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याची तरतूद करण्यांत आली आहे. या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी दिनांक ३१ मार्च, २०१३ पर्यंत करणे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना अनिवार्य आहे. या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजी "शिक्षण हक्क अभियान" सुरु करण्यांत आले आहे.

या अधिनियमातील महत्त्वाच्या तरतूदींची माहिती सर्व महानगरपालिकांचे सदस्य/ पदाधिकारी यांना होणे आवश्यक आहे. त्याकरिता सर्व महानगरपालिकांमध्ये दिनांक ३० नोव्हेंबर, २०१२ रोजी "विशेष सर्वसाधारण सभा" आयोजित करावी. या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये शिक्षण विभागाचे अधिकारी सर्व सदस्य/ पदाधिकारी यांना मार्गदर्शन करतील.

उपरोक्त अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांनी अर्धशासकीय पत्र क्र. आरटीई-२०१२/ (११४/१२)/ प्राशि-१ , दिनांक २५ ऑक्टोबर, २०१२ अन्वये सर्व महानगरपालिका व इतर संबंधितांना निदेश दिले आहेत. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ज.ना. पाटील)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
विभागीय आयुक्त (सर्व ),
मा. महापौर, महानगरपालिका (सर्व ),
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
संचालक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सहसचिव ( प्राशि-१) , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (नवि-२६)

C:\Documents and Settings\admin\Desktop\Letter November 2012.doc

७५/५

जयन्त कुमार बाँठिया
मुख्य सचिव

अ.शा.पत्र क्रमांक - आरटीई-२०१२/(११४/१२)प्राशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-२५ ऑक्टोबर,२०१२.

विषय :- "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९" याची दिनांक ३१/३/२०१३ पर्यंत अंमलबजावणी करण्याबाबत....

प्रिय श्री.

आपणांस माहितच आहे की, "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९" (यानंतर अधिनियम २००९) राज्यामध्ये दिनांक ०१ एप्रिल, २०१० पासून लागू करण्यात आला आहे. सदर कायद्यातील तरतुदी व निकषाप्रमाणे दि. ३१/३/२०१३ पर्यंत कार्यवाही पूर्ण करणे सर्वांवर बंधनकारक आहे.

२. राज्यामध्ये सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या सुमारे १ लाख शाळा व्यवस्थितपणे शिक्षण देतात किंवा नाही हे बघण्याची प्राथमिक जबाबदारी शिक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांची असली तरीही, त्यांच्यावर खालील नमूद केल्याप्रमाणे नियंत्रक अधिकारी काम करतात:-

| व्यवस्थापन | शाळांची संख्या | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | ६२,०४० | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. |
| नगरपालिका | १४५३ | मुख्य अधिकारी /जिल्हाधिकारी |
| महानगरपालिका | १४४ | महानगरपालिका आयुक्त |
| इतर शासकीय विभाग | ८७४ | आयुक्त आदिवासी विकास /समाजकल्याण |
| खाजगी | ३२५७३ | शिक्षण उपसंचालक |
| एकूण | १००,०८४ | |

सध्या राज्यात कार्यरत असलेल्या शाळांचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी सुमारे २७,००० कोटी रुपये व योजनांवर ३००० कोटी एवढा निधी खर्च केला जातो.

३. "अधिनियम, २००९" ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली "शिक्षणाचा हक्क अभियान" या कार्यक्रमाचा शुभारंभ दिनांक ११/९/२०१२ रोजी मुंबई येथे संपन्न झाला. ह्या कार्यक्रमात स्पष्ट केल्याप्रमाणे अधिनियम, २००९ याची प्रभावी अंमलबजावणी ३१/३/२०१३ पर्यंत करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. यासाठी आपण योग्य ती सर्व उपाययोजना करावी. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे:-

i) राज्यातील सर्व खाजगी शाळांना शासनाची मान्यता दिनांक ३१/३/२०१३ पर्यंत घेणे व दर तीन वर्षांनंतर मान्यतेचे नुतनीकरण करणे.

ii) शाळेचे सर्व कामकाज शाळा व्यवस्थापन समितीमार्फत हाताळणे आवश्यक असल्याने, सर्व शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करणे, सदस्यांना प्रशिक्षित करणे व त्यांना मार्गदर्शन करणे.

[पु.पा.प.


दूरध्वनी कार्यालय ०२२-२२०२५०४२/२२०२८७६२ फॅक्स : २२०२८५९४ ईमेल : chiefsecretary@maharashtra.gov.in

iii) समाजातील शेवटच्या बालकापर्यंत त्यांच्या मुलभूत अधिकाराबद्दल माहिती होईल या दृष्टीने "अधिनियम २००९" चा प्रचार व प्रसार करणे.

iv) सर्व खाजगी विना अनुदानीत शाळांमध्ये पहिल्या वर्गात दुर्बल व वंचित घटकांना २५% प्रवेश मिळवून देणे.

v) दिनांक ०२ ते ०५ ऑक्टोबर, २०११ रोजी झालेल्या विशेष पटपडताळणी मोहिमे अंतर्गत दोषी असलेल्या शाळांवर / संस्थांवर त्वरीत कारवाई करणे.

vi) सर्व प्रकारच्या योजनांसाठी **UDIES** (Unified District Information of Education System) डाटाचा वापर करणे.

vii) दिनांक ०१ ऑक्टोंबर, २०१२ पासून **UDIES** (Unified District Information of Education System) करिता नवीन माहिती संकलित केली जाणार आहे. ही माहिती अचूक राहील याची काळजी घेणे.

viii) शाळा व क्रीडांगणासाठी आवश्यक त्या ठिकाणी शासकीय जमीन उपलब्ध करुन देणे.

ix) जून २०१३ पर्यंत सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना आधार कार्ड देणे.

x) महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांना महिन्याच्या पहिल्या तारखेस **ECS** पद्धतीने नियमित वेतन वाटप करणे.

xi) केंद्र शासन पुरस्कृत योजनांचे योग्य ते नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करणे उदा. सर्व शिक्षा अभियान (SSA), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान (RMSA), माहिती व तंत्रज्ञान (ICT), कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV), पंचायत युवा क्रिडा व खेल अभियान (PYKKA) इत्यादी.

४. शालेय शिक्षण विभागामार्फत अधिनियम २००९ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विविध शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत, अथवा करण्यात येत आहेत. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून अपर मुख्य सचिव यांनी स्वत: महसूल विभाग निहाय विभागीय अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा जुलै / ऑगस्ट, २०१२ मध्ये आयोजित केल्या होत्या. या कार्यशाळेमध्ये सर्व संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. तसेच अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांनी वेळोवेळी आपणा सर्वांबरोबर व्हिडीओ कॉन्फरन्सीग करुन आवश्यक त्या सुचना दिलेल्या आहेत.

५. तरी, अधिनियम २००९ ची प्रभावी अंमलबजावणी दि. ३१/३/२०१३ पर्यंत करण्यासाठी आपण आपल्या स्तरावरुन योग्य ती सर्व उपाययोजना करावी. याबाबत मी स्वत: व अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग वेळोवेळी आढावा घेणार आहे.

सस्नेह,

आपला स्नेहांकित,

(signature)

(जयन्त कुमार बाँठिया)

विभागीय आयुक्त (सर्व)

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषीत :-
आयुक्त, सर्व महानगरपालिका / सर्व जिल्हाधिकारी / सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक / मुख्याधिकारी सर्व नगरपरिषद / सर्व शिक्षणाधिकारी

२०५-२९२६-१३.